## चित्रपट - शेजारी

हिंदु मुसलमान ऐक्य या संवेदनशील विषयावरील 'शेजारी' या चित्रपटाच्या प्रत्येक गीतासाठी व्ही शांताराम यांनी अतिशय परिणामकारक प्रसंगांची निवड केली होती. "शब्दात जेवढे लालित्य, चित्रमयता आणि वैविध्य आणता येईल तेवढे आणा" अशी सूचना त्यांनी आठवल्यांना केली होती. मास्टर कृष्णराव यांच्याकडून आगळ्या वेगळ्या चाली काढून घेतल्या होत्या आणि बहारदार पार्श्वसंगीताची योजना केली होती.

नायक नायिकांचे प्रेमप्रसंग खुलवणारी 'हासत वसंत ये वनी', राधिका चतुर बोले', अशी गोड प्रेमगीते आठवल्यांनी लिहिली. त्यात 'अलबेला; यासारखे अनवट शब्द वापरून ती खुलवली. 'लख लख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया' हे मशालींचे नृत्यगीत तर अजरामर आहे. आजही, सत्तर वर्षांनंतर ते अनेक कार्यक्रमात सादर होते आणि नव्या गाण्यांहून जास्त गाजते. धरण फुटून प्रलय होतो. गाव वाहून जाते असे दृश्य खरे वाटावे म्हणून ही शांताराम यांनी खास प्रल्हाददत्त नावाचा स्पेशल इफेक्ट्सचा तज्ञ आणला होता. त्या प्रसंगानंतरचे 'सारे प्रवासी घडीचे' हे समूहगीत त्यातल्या अर्थपूर्ण शब्दांनी चित्रपटाचा शेवट वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवला आहे.

## चित्रपट - शेजारी

### लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया

लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया
झळाळती कोटी ज्योती या – हां – हां हां.

चला धरू रिंगण, चुडी गुढी उंचावून
आकाशीच्या अंगणात, मंजुळ रुणझुण
नाचती चंद्र तारे वाजती पैंजण
छुन छुन झुम झुम, हां हां.

झोत रुपेरी भूमिवरी, गगनात
धवळली सारी सृष्टी, नाचत डोलत
कणकण उजळीत, हासत हसवीत
करी शिणगार, हां हां.

आनंदून रंगून, विसरुनि देहभान
मोहरली सारी काया हरपली मोहमाया
कुडी चुडी पाजळून प्राणज्योती मेळवून
एक होऊ या, हां हां.

## चित्रपट - शेजारी

### हासत वसंत ये वनी, अलबेला

हासत वसंत ये वनी, अलबेला, हां
प्रियकर पसंत हा मनी धरणीला.

घनवन राई, बहरूनी येई
कोमल मंजुळ कोयल गाई
आंबा पाही फुलला, चाफा झाला पिवळा
जाई जुई चामेलीला भर आला शेवंतीला
घमघमला ! हासत वसंत ये वनी, अलबेला

सतेज टवटवली, कळी जशी कवळी
नभात लुकलुकली चंद्रकोर इवली
आला शीतळ वारा, बरसत अमृतधारा
मृदुल फुलांचा करी झुला, अलबेला
हासत वसंत ये वनी, अलबेला

## चित्रपट - शेजारी

### राधिका चतुर बोले

राधिका चतुर बोले
'तुझी माझी प्रीत जुळे, कान्हा.'

चल, प्रीतिपंख पसरू, गगनी स्वैर फिरू
गिरिशिखर सागरांना लंघुनि मेघांना. नवलाख दिव्य
रमणी, मंगलमय गाणी
आळविती गगनी
मधि कांत शांत हसरा, करिती फेर पुरा.

ही तेजाची गंगा, चल चल श्रीरंगा घालु इथे पिंगा
करू प्रेम अमर अपुले
तुझी माझी प्रीत जुळे, कान्हा
राधिका चतुर बोले

## चित्रपट - शेजारी

### जिवाचं मैतर तुम्ही माझ्या

जिवाचं मैतर तुम्ही माझ्या
चल चल सरजा, चल राजा रे.

बाग मळ्यांची दाटी रे, पिकती माणिक मोती रे
लवलव करिते हिरवळ रे, फुलली नाजूक मखमल रे.

दौलत ही न्यारी, फुलवित शेतकरी
त्यास उणे सारे, दुनियेचे वैभव रे.

मंगल घर अपुले, गोकुळ गजबजले
प्रीत इथे झुळझुळते, सुख ममतेचे माहेर रे.

## चित्रपट - शेजारी

### सारे प्रवासी घडीचे

सारे प्रवासी घडीचे, नांदू सुखे संगती.

या दुनियेच्या अफाट हाटी
पडती गाठी भेटी अवचित,
पडती गाठी भेटी
बोलू संगे, चालू संगे
खेळू नाचू हसू रुसू संगे.

पाहू संगे सुख सोहाळे
साहू संगे विजा वादळे
जीव संगे भाव संगे
प्राण देऊ संगती.

प्रीति मैत्रीच्या पावन तीर्थी
न्हाऊ, देऊ जिवा सुख शांती.